# SCAN STEELS LTD.
CIN : L27209MH1994PLC076015

+91 80931 15221
scansteels@scansteels.com
www.scansteels.com


Date: 31st July, 2023

To,
The General Manager
Department of Corporate Services
Bombay Stock Exchange Limited
Floor 25, P.J. Towers, Dalal Street,
Mumbai-400 001

**BSE Code: 511672**

**Sub: News Paper Publication –Un-Audited Financial Results for Quarter ended on 30th June, 2023.**

Dear Sir/Madam,

Please Find enclosed herewith copies of the Advertisement with respect to the Un-Audited Financial Results for Quarter ended on 30th June, 2023, published in the Financial Express and Pratahkal on 30th July, 2023

Please acknowledge and take on record the same.

Thanking you,

For **SCAN STEELS LIMITED**

PRABIR KUMAR DAS

Digitally signed by PRABIR KUMAR DAS
Date: 2023.07.31 16:09:41 +05'30'

**Prabir Kumar Das**
**President & Company Secretary**
**Encl: As above**

# मुंबई-नाशिक महामार्ग खड्डेमुक्त करा!

## वाहतूक कोंडीतून नागरिकांची सुटका करण्याचे मुख्यमंत्र्यांचे आदेश



**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : मुंबई-नाशिक महामार्गावरील खड्डे आणि सततच्या वाहतूक कोंडींची गंभीर दखल घेत हा मार्ग तातडीने खड्डेमुक्त करावा तसेच या महामार्गाचे काम वेळेत पूर्ण व्हावे याकडे लक्ष द्यावे, असे आदेश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणास दिले. मुंबई-नाशिक आणि भिवंडी- वाडा रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री शिंदे यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर बैठक घेऊन रस्ते खड्डेमुक्त करण्याचा आदेश दिला. कामचुकार अधिकारी आणि ठेकेदारांवर कठोर कारवाईचे आदेश दिले. याच बैठकीत मुंबई-नाशिक महामार्गावरील पडघा-खडावली येथे झालेल्या अपघातातील मृतांच्या वारसांना मुख्यमंत्री सहायता निधीतून पाच लाख रुपये देण्यात यावेत. हा निधी ठाणे जिल्हाधिकाऱ्यांकडे सुपूर्द करण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले. वाडा-भिवंडी रस्त्याच्या दुरूस्तीचे काम दर्जेदार आणि वेळेत व्हावे. निकृष्ट कामासाठी संबंधित कंत्राटदार आणि अभियंत्यावर कठोर कारवाई करा तसेच या दोन्ही रस्त्यांवरून ठाणे आणि मुंबई शहर परिसरात येणाऱ्या वाहतुकीचे नियमन करा. अवजड आणि मालवाहतुकीच्या वाहनांसाठी वेळेचे नियोजन करुन नागरिकांची वाहतूक कोंडीतून सुटका करण्याचे आदेशही शिंदे यांनी सार्वजनिक बांधकाम विभागास दिले. राज्यातील विविध रस्त्यांवर पडलेल्या खड्ड्यांवरून विरोधकांनी मंगळवारी विधानसभेत सरकारला धारेवर धरले होते. तसेच खड्डे बुजविले जाईपर्यंत टोल वसूली थांबविण्याची मागणीही केली होती. काही महामार्गावर रस्ते की खड्डे अशी बिकट अवस्था निर्माण झाली आहे. खड्ड्यांमध्ये पडून दुचाकी चालकांचे मृत्यू अलीकडेच झाले आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व केंद्रीय राज्यमंत्री कपिल पाटील यांच्या ठाणे जिल्ह्यात सर्वत्र खड्ड्यांचे साम्राज्य पसरले आहे. मुख्यमंत्र्यानी आदेश देऊनही खड्डे बुजबले जात नाहीत. खड्डे असूनही टोल वसूल केला जातो. अनेक ठिकाणी रस्त्यांची दुर्दशा झाली असून टोल घेणाऱ्या कंपन्यांना सरकार पाठिशी घालत असल्याचा आरोप विरोधकांनी केला.

### रस्ते दुरुस्तीकडे लक्ष देण्याचे प्रशासनाला आदेश

मुंबई- नाशिक महामार्गाच्या रुंदीकरणाच्या कामात विलंब होऊ नये याकडे महामार्ग प्राधिकरणाने विशेष लक्ष पुरवण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. खडवली टोल नाक्याच्या परिसरातील तसेच सेवा- रस्त्यांच्या ठिकाणाच्या सुविधांकडे लक्ष द्यावे. नागरिकांना कुठल्याही परिस्थितीत त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याचे आदेशही मुख्यमंत्र्यांनी दिले. मुंबई-गोवा, पालघर- अहमदाबाद या महामार्गासोबतच वसई येथे पावसामुळे झालेल्या दुरवस्थेमुळे नागरिकांना अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. त्यासाठी प्राधिकरणाने तातडीने उपाययोजना करण्याच्या सुचनाही त्यांनी दिल्या. वाडा- भिवंडी रस्त्याच्या दुरूस्तीचे का संथ गतीने सुरु असल्याबाबत तसेच या परिसरात खड्ड्यांमुळे नागरिक त्रस्त असल्याबद्दल शिंदे यांनी नाराजी व्यक्त करीत प्रशासनास धारेवर धरले.

# टाटा रुग्णालयाच्या औषध विक्री केंद्राच्या कंत्राटामध्ये नियमांचे उल्लंघन

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : कर्करोग रुग्णांना स्वस्त व माफक दरात औषधे उपलब्ध व्हावीत यासाठी टाटा कर्करोग रुग्णालयातील औषध विक्री केंद्राचे कंत्राट टाटा हेल्थकेअर सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड (टाटा वन एमजी) या कंपनीला देण्यात आले आहे. मात्र हे कंत्राट देताना टाटा रुग्णालयाने निविदा प्रक्रियेत सरकारच्या अटी व शर्तींना तिलांजली दिली असून प्राथमिकदृष्ट्या टाटा वन एमजी या कंपनीला कंत्राट कसे मिळेल यासाठी प्रयत्न केल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे टाटा वन एमजीला दिलेल्या या कंत्राटाबाबत शंका उपस्थित करण्यात येत आहे. देशभरातून मुंबईतील टाटा कर्करोग रुग्णालयात येणाऱ्या कर्करोग रुग्णांना रुग्णालयातील औषध विक्री केंद्रांत स्वस्त दरात औषध उपलब्ध होतात. मात्र औषध विक्री केंद्राकडे औषधे ठेवण्यासाठी पुरेशी जागा नसल्याने आणि रुग्णांना तातडीने औषध मिळावे यासाठी टाटा रुग्णालयाने औषध विक्री केंद्र खासगी तत्त्वावर चालविण्याचा निर्णय घेतला. मात्र हे कंत्राट टाटा वन एमजी कंपनीला मिळावे यासाठी रुग्णालय प्रशासनाने अटी व शर्तींचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आले आहे. निविदा सादर करणाऱ्या कंपनीची २०२१-२२ मधील वार्षिक उलाढाल जवळपास ६०० कोटी रुपये असावी अशी अट घालण्यात आली आहे. मात्र टाटा वन एमजीला २०२१-२२ मध्ये ५२६ कोटी रुपयांचे नुकसान झाले होते. तरीही दरवर्षी ४०० कोटी रुपयांच्या औषधांची खरेदी - विक्री करणारे केंद्र टाटा वन एमजी कंपनीला आंदण देण्यात येत आहे. कंपनीने रुग्णालयाच्या दरपत्रकातील सर्व अटी व नियम २०२२ ते २०२४ दरम्यान मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केले आहे. मात्र निविदेच्या परिशिष्ठ 'क'नुसार हा करार २०२७ पर्यंत आहे. त्यामुळे २०२४ नंतर औषधांचे दर व अन्य बाबींची जबाबदारी कोणची असा प्रश्न उपस्थित होत आहे. औषध विक्री केंद्रासंदर्भात १८ ऑगस्ट २०२२ रोजी निविदा काढण्यात आली होती. त्यावेळी निविदा सादर केलेल्या सर्व कंपन्यांना तांत्रिकदृष्ट्या अपात्र ठरवून प्रक्रियाच रद्द करण्यात आली होती. त्यानंतर २५ ऑक्टोबर २०२२ रोजी दुसरी निविदा काढण्यात आली होती. मात्र यासाठी आवश्यक असलेली निविदापूर्व बैठकच घेण्यात आली नाही. त्यामुळे ६०० कोटी रुपयांच्या या कंत्राटाबाबत शंका निर्माण होत आहे.


मध्य रेल्वे

साहित्य व्यवस्थापक विभाग

ई-प्रॉक्युअरमेंट जाहिरात निविदा सूचना क्र. E-30/2023, दि. २७.०७.२०२३

| निविदा क्र. | बाब विवरण | मात्रा | नियत तारीख |
|---|---|---|---|
| १८२३२०९८ए | ऑटो ड्रेन व्हेल्वकरिता दुरुस्ती किट | ५२६ संख्या | ०७.०८.२३ |
| १८२३२२१८ | स्पीन- ऑन फ्युएल फिल्टर असेंबली | १४०० संख्या | १४.०८.२३ |
| ४१२३१००३ | अर्थिंग केबल | १७८५ संख्या | १४.०८.२३ |
| ५०२३३०९१ | रिले, एसी इम्युन, प्लग इन टाईप, स्टाईल क्यूएनए१के आदी | १२४१ संख्या | १४.०८.२३ |
| १८२३२२०९सी | ट्रॅक्शन मोटर सस्पेंशन रोलरचा सेट | ६० संख्या | १६.०८.२३ |
| ३८२३३५०६ | टॉप साईड बीअरर लाईनर | ५००० संख्या | १७.०८.२३ |
| ४१२३१०१६ | हिताची टीएम टाईप एचएस-१०५० ईआर/एचएस-१५२५०ए करिता कार्बन ब्रश | २३३१२ संख्या | १७.०८.२३ |
| ४२२३५०१४ | बीएचईएल मेक एसी ईएमयूकरिता डुअर कंट्रोल युनिट (डीसीयू) | १५ संख्या | १७.०८.२३ |
| ४१२३१११७ | थिन वॉल्ड ईलेक्ट्रॉन बीम फ्लेक्झीबल ईलास्टोमेरिक केबल २४० चौ. मीमी | १६७०४ मीटर | १८.०८.२३ |
| २७२३१९१० | सस्पेंशन स्प्रिंग्जचा सेट | १०४ सेट | २१.०८.२३ |
| २७२३३६३७ | कंट्रोल ईलेक्ट्रॉनिक्सकरिता कॉन्टॅक्टर | ५९ संख्या | २१.०८.२३ |
| ४१२३२००३ | एचएस १५२५० आर्मेचरकरिता स्पायरल ट्यूब | २२८० मीटर | २१.०८.२३ |
| ४३२३४०२५ए | बॅटरी चार्जर युनिट प्री-कुलिंग | १६ संख्या | २१.०८.२३ |
| ८०२३३१५१ | ट्रान्सफॉर्मर ऑईल | ९६५५८ लीटर | २१.०८.२३ |
| २७२३१०२१ | हिताची गीअर केस असेंबली | ४३३ संख्या | २२.०८.२३ |
| २७२३४६२० | ब्रेक शोए | ३०४६ संख्या | २३.०८.२३ |
| ३८२३०३०६ए | कम्बाईन्ड प्रेशर रिड्युसिंग व्हेल्व | ३५० संख्या | २३.०८.२३ |
| ४२२३१२८३ | मे. एस्कोर्ट्स मेककरिता पीओएच किट | २९९ सेट | २३.०८.२३ |
| ७५२३१०९७ | ब्रेझिंग रॉड साईझ २ मीमी व्यास x ६०० मीमी | ३२० किग्रॅ | २३.०८.२३ |
| ४१२३१६७९बी | ग्लास बँडलिंग टेप साईझ ०.३३ x २० मीमी | २०९५०७ मीटर | २५.०८.२३ |
| ४२२३१२६५ | मॅग्नेट व्हेल्व कम्प्लीट | १३७ संख्या | २८.०८.२३ |
| ४२२३१३६७ | इंटरनल डिस्प्ले | ३५ संख्या | २८.०८.२३ |
| ४२२३१४३७ए | सेंटर पायवोट पिन कम्प्लीट | १२७ संख्या | २८.०८.२३ |
| ४२२३४२८१ | सेंटरिंग डिव्हाईज | ४३४ संख्या | २८.०८.२३ |
| ४३२३०००५ए | एमर्जेन्सी बॅटरी चार्जर | १४२ संख्या | २८.०८.२३ |
| ३८२३३७२६ | एम्प्टी लोड डिव्हाईज आयआर-ईएलडी-१० कम्प्लीट असेंबली | ६३० संख्या | ३१.०८.२३ |
| ४३२३१०२८ | एम. एस. स्टड्स | ५१३५७ संख्या | ०४.०९.२३ |

विस्तृत सूचना व निविदा अटी वेबसाइट www.ireps.gov.in वर पाहाता येतील व डाऊनलोड करता येतील.

प्रमुख मुख्य साहित्य व्यवस्थापक / छशिमट

तिकीटांकरिता यूटीएस ॲप डाऊनलोड करा.

Mol. 349


# तिन्ही रेल्वे मार्गावर उद्या 'मेगाब्लॉक'



**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : मध्य, पश्चिम आणि हार्बर रेल्वे मार्गावर विविध आभियांत्रिक आणि देखभाल - दुरुस्तीच्या कामांसाठी रविवारी मेगाब्लॉक घेण्यात आला आहे. या मेगाब्लॉकमुळे अनेक लांब पल्ल्याच्या आणि उपनगरीय लोकलच्या वेळापत्रकात बदल केला आहे. त्यामुळे या काळात लोकल विलंबाने धावणार आहेत.

**मध्य रेल्वे**

**कुठे** : ठाणे - कल्याणदरम्यान पाचवी आणि सहावी मार्गिका

**कधी** : सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत

**परिणाम** : ब्लॉक कालावधीत सीएसएमटी दिशेकडे जाणाऱ्या आणि सीएसएमटीवरून सुटणाऱ्या लांबपल्ल्यांच्या गाड्या १० ते १५ मिनिटे विलंबाने धावतील. सकाळ ९.५० ची वसई रोड - दिवा मेमू कोपपर्यंत चालवण्यात येईल. ही मेमू कोपर - दिव्यादरम्यान रद्द करण्यात आली आहे. तसेच ही मेमू दिव्यावरून न सुटता, सकाळी ११.४५ वाजता कोपर ते वसई रोडदरम्यान धावणार आहे.

**हार्बर मार्ग**

**कुठे** : पनवेल - वाशीदरम्यान अप आणि डाऊन मार्गावर

**कधी** : सकाळी ११.५ ते दुपारी ४.५ वाजेपर्यंत

**परिणाम** : ब्लॉक कालावधीत पनवेलवरून सीएसएमटीला जाणारी आणि सीएसएमटीवरून पनवेल आणि बेलापूरला जाणारी लोकल सेवा रद्द केली आहे.

**पश्चिम मार्ग**

**कुठे** : मरिन लाइन्स ते माहीम डाऊन धिम्या मार्गावर

**कधी** : सकाळी १०.३५ ते दुपारी ३.३५ वाजेपर्यंत

**परिणाम** : ब्लॉक कालावधीत डाऊन धिम्या मार्गावरील लोकल मरिन लाइन्स ते माहीम स्थानकांदरम्यान जलद मार्गावर वळविण्यात येणार आहेत.

# एमएमआरडीएला मेट्रो प्रकल्पासाठी १६० कोटी मिळणार

## मुद्रांक शुल्कावरील अधिभाराची रक्कम देण्यास राज्य सरकारची मान्यता

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : राज्य सरकारकडून मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला (एमएमआरडीए) मेट्रो प्रकल्पासाठी लवकरच १६० कोटी रुपये मिळणार आहेत. मेट्रो प्रकल्पांना आर्थिक बळकटी मिळावी यासाठी मेट्रो मार्गालगतच्या परिसरातील काही निश्चित अंतरावरील मालमत्ता खरेदी - विक्रीवर एक टक्का मेट्रो उपकर (मुद्रांक शुल्क अधिभार) आकारण्यात येत आहे. या अधिभारापोटी जमा झालेल्या रक्कमेतील १६० कोटी रुपये मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी उपलब्ध होणार आहेत.वाहतूक व्यवस्था बळकट करण्यासाठी आणि आंतरराष्ट्रीय दर्जाची वाहतूक व्यवस्था विकसित करण्यासाठी राज्यात मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे. मुंबई, मुंबई महानगर प्रदेशात एमएमआरडीए, पुण्यात पीएमआरडीए, नवी मुंबईत सिडको, नागपूरात महाराष्ट्र मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशन, नागपूर यांच्या माध्यमातून मेट्रो प्रकल्प राबविण्यात येत आहे.

या मेट्रो प्रकल्पांना राज्य सरकारने नागरी परिवहन प्रकल्प म्हणून मान्यता दिली आहे. या प्रकल्पांना आर्थिक बळ देण्यासाठी मुद्रांक शुल्कावर एक टक्का अधिभार आकारण्यात येत आहे. मेट्रो मार्गालगतच्या परिसरातील काही निश्चित अंतरावरील मालमत्ता खरेदी - विक्रीवर एक टक्का मेट्रो उपकर (मुद्रांक शुल्क अधिभार) आकारण्यात येतो. यातून जमा होणारी रक्कम मेट्रोच्या कामासाठी उपलब्ध करण्यात येते. मेट्रोच्या कर्जाची परतफेड वा मेट्रोच्या कामांसाठी ही रक्कम आवश्यक आहे. अधिभारापोटी जमा होणारी रक्कम संबंधित सरकारी यंत्रणेला नगर विकास विभागाच्या माध्यमातून वेळोवेळी वितरित करण्यात येते.

या तरतुदीनुसार आतापर्यंत मुंबई मेट्रोसाठी ८०० कोटी रुपये, पुणे मेट्रोसाठी १५० कोटी रुपये, नागपूरसाठी ५० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत. आता २०२३-२४ अंतर्गत मुंबई मेट्रो प्रकल्पासाठी १६० कोटी रुपये देण्यास नगर विकास विभागाने मान्यता दिली आहे. यासंबंधीचा शासन निर्णय शुक्रवारी जारी करण्यात आला आहे.


हरिष टेक्सटाईल इंजिनीअर्स लिमिटेड

सीआयएन : L29119MH2010PLC201521

२ रा मजला, १९ पारसी पंचायत रोड, अंधेरी पूर्व, मुंबई ४०० ०६९.

दूर. ०२२-४०३७३०००/२८३६७१५१/२/३ ईमेल : investor@harishtextile.com

वेबसाइट : www.harishtextile.com

कंपनीच्या सभासदांचे लक्ष वेधून घेण्याकरिता सूचना

सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की, कंपनी कायदा, २०१३ च्या अन्य लागू तरतूदी व अनुच्छेद १०८ व ११० च्या तरतूदी अंतर्गत व कंपनी (व्यवस्थापक व प्रशासन) नियम, २०१४ (एकत्रितरित्या ॲक्ट), सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता), २०१५ (सूची विनियमन), सेक्रेटरियल स्टॅन्डर्ड्स-२ यांच्याद्वारे कंपनी सेक्रेटरी ऑफ इंडिया यांची संस्थाद्वारे जारी व अन्य लागू नियम व विनियमन अनुसार कोणत्याही वैधानित सुधारणा वा पुन:एनॅक्टमेंट अनुसार वेळोवळी जारी हरिष टेक्सटाईल इंजिनीअर्स लिमिटेड (कंपनी) यांना सभासदांकडून मंजूरी देऊन व ठरावावर आयोजित टपाली मतदान सूचना दि. २७ जुलै, २०२३ रोजी (टपाली मतदान सूचना) अनुसार ईलेक्ट्रॉनिक मतदान मार्फत (ई-मतदान/ परोक्ष ई-मतदान) केवळ मार्फत करावे.

ॲक्टच्या संबंधित तरतूद व मिनीस्ट्री ऑफ कॉर्पोरेट अफेअर्स यांच्याद्वारे जारी मार्गदर्शन अनुसार टपाली मतदान ई-मतदान अंतर्गत सामान्य सर्क्युलर क्र. १४/२०२० दि. ०८ एप्रिल, २०२०, सामान्य सर्क्युलर क्र. १७/२०२० दि. १३ एप्रिल, २०२०, सामान्य सर्क्युलर क्र. २०/२०२० दि. ०५ मे, २०२०, सामान्य सर्क्युलर क्र. २२/२०२० दि. १५ जून, २०२०, सामान्य सर्क्युलर क्र. ३३/२०२० दि. २८ सप्टेंबर, २०२० सामान्य सर्क्युलर क्र. ३९/२०२० दि. ३१ डिसेंबर, २०२०, सामान्य सर्क्युलर क्र. १०-२०२१ दि. २३ जून, २०२१ व सामान्य सर्क्युलर क्र. २०/२०२१ दि. ०८ डिसेंबर, २०२१ (एमसीए सर्क्युलर्स) म्हणून टपाली मतदान सूचना अनुसार प्रक्रिया परोक्ष ई-मतदान संबंधात माहिती सर्व सभासदांना पाठविली आहे व ईमेल आयडी कंपनी वा डिपॉजिटरी/ डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स वा मे. बिगशेअर सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, रजिस्ट्रर व शेअर ट्रान्सफर एजन्ट्स वा कंपनी (आरटीए) यांच्यासह नोंदणीकृत करून ज्यांचे नाव सभसदांचे रजिस्ट्रर /लाभार्थी मालक यांची सूची शुक्रवार, दि. २८ जुलै, २०२३ (निर्धारित तारीख) अनुसार, दि. २९ जुलै, २०२३ रोजी पाठवली आहे.

एखादी व्यक्ती जर निर्धारित तारीख अनुसार सभासद नसेल तर माहिती हेतुकरिता टपाली मतदान सूचना पाहावी.

एमसीए सक्युलर्स आवश्यकता अनुसार प्रत्यक्ष टपाली मतदानाची सूचना व टपाली मतदान प्रपत्र व प्री-पेड बिझीनेस लिफाफा भागधारक यांना पाठविली नाही आहे व ई-मतदान प्रणाली मार्फत असेंट व डिसेंट यांना संपर्क साधणे आवश्यक आहे.

सर्व सभासदांना याद्वारे सूचित करण्यात येते की :

१. ई-मतदान कालावधीची सुरुवात सोमवार, दि. ३१ जुलै, २०२३ रोजी (९.०० वा. भाप्रवे) सुरु होत आहे व मंगळवार, दि. २९ ऑगस्ट, २०२३ रोजी (५.०० वा. भाप्रवे) बंद होत आहे व सर्व सभासदांनी प्रत्यक्ष स्वरूपातील वा डिमॅट स्वरूपातील शेअर्स धारक असल्यास सादर करावे. ई-मतदान मोड्युल आरटीद्वारे अकार्यरत केला जाईल. परोक्ष ई-मतदान सदर तारीख व वेळेनंतर अकार्यरत करण्यात येईल.

२. सदर व्यक्ती ज्यांचे सभासदांचे रजिस्ट्रमध्ये नाव नाही अशा लाभार्थी मालक यांचे रजिस्ट्रर परोक्ष ई-मतदान सुविधा प्राप्त करण्याकरिता निर्धारित तारीख अनुसार रजिस्ट्रर करावे.

३. कंपनीने मे. डी एन वोरा अॅन्ड असोसिएट्स प्रॅक्टीसिंग कंपनी सचिव यांना परिनिरीक्षक म्हणून टपाली मतदान स्पष्ट व पारदर्शक पद्धतीने पार पाडावे म्हणून परोक्ष ई-मतदान प्रक्रिया मार्फत आयोजित केले आहे.

४. टपाली मतदान ई-मतदानाचा अहवाल गुरुवार, दि. ३१ ऑगस्ट, २०२३ रोजी (५.०० वा.) घोषित करण्यात येईल व कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय येथे परीनिरीक्षक अहवाल यांच्यासह अहवाल कंपनीची वेबसाइट http://www.harishtextile.com वर प्रसिद्ध केली आहे व आरटीए वेबसाइट https://ivote.bigshareonline.com व स्टॉक एक्सचेंज जेथे कंपनीची सूची उपलब्ध आहे.

जर तुम्ही तुमचे कंपनी/ डिपॉझिटरी यांच्यासह ईमेल आयडी नोंदणीकृत न केल्यास तुम्ही कृपया खालील माहिती पाहावी :

१. डिमॅट भागधारक : तुमचे ईमेल आयडी व मोबाईल क्रमांक व तुमचे संबंधित डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स (डीपी) यांच्यासह अद्ययावत करावे.

पुढील तपशिलाकरिता कृपया टपाली मतदान सूचना पाहावी. सूचना कंपनीची वेबसाइट http://www.harishtextile.com वर उपलब्ध आहे.

जर तुम्हाला कोणतीही चौकशी व तक्रार असल्यास ई-मतदान वा माहितीकरिता ई-मतदानाकरिता सुविधा ivote.bigshareonline.com वर आम्हाला १८००२२५४२२ वर संपर्क साधावा.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
हरिष टेक्सटाईल इंजिनीअर्स लिमिटेडकरिता
सही/-
हितेंद्र देसाई
संपूर्ण वेळ संचालक
(डीआयएन ००४५२४८१)

ठिकाण : मुंबई
दिनांक : २९.०७.२०२३



जाहीर नोटीस

या नोटिसद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते कि, माझे अशील श्री.शंकर गणपत जाधव आणि सौ.सुनीता शंकर जाधव, यांच्या सदनिकेचे ओरिजनल सेल ॲग्रीमेंट मे. डेकोन बिल्डर्स आणि आणि श्रीमती मेघा राजेंद्र बांदेकर आणि श्री राजेंद्र पुंडलिक बांदेकर., या दोघानमधील दस्तऐवज दिनांक २९/०४/२०१३ रोजी सकाळी ११.०० वाजता डाफ्टरी रोड, मालाड पूर्व येथे हे अग्रीमेन्ट श्रीमती मेघा राजेंद्र बांदेकर आणि श्री राजेंद्र पुंडलिक बांदेकर यांच्याकडून गहाळ झाले आहे.

या सदनिकेवर किंवा सदनिकेच्या एखाद्या भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा किंवा दावा असल्यास त्यांनी नोटीस प्रसिद्धी झाल्यावर ०७ दिवसाच्या आत कागदपत्रे माझ्या कार्यालयात घेऊन येणे. तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कोणत्याही प्रकार हक्क, हितसंबंध नाही असे समजून किंवा कोणाचाही असल्यास तो सोडून देण्यात आला आहे.

श्री.डी.एस.तिवारी
(उच्च न्यायालय वकील)

दिनांक :- ३०/०७/२०२३

पत्ता-दुकान नं. १९ आकांक्षा टॉवर, रेल्वे स्टेशनजवळ, नालासोपारा पूर्व



जाहीर सूचना

सूचना याद्वारे देण्यात येते की, माझे अशील **श्री. काशीराम सखाराम जोशी** हे विरार स्टेशन येथून जात होते व माझे अशील यांचे मूळ शेअर प्रमाणपत्र ऑटो रिक्षामधून विरार पश्चिम येथे दि. १७.०७.२०२३ रोजी अंदाजे ०७.०३ वा. गहाळ झाले, शेअर प्रमाणपत्र क्र. ०९ सभासदत्व रजिस्टर क्र. ०९ व शेअर्सची संख्या ५ व फ्लॅट क्र. २०३, २ रा मजला, ए विंग, **पुनम टॉवर को-ऑप. हा. सो. लि., गाव विरार, एम. बी. इस्टेट, विरार पश्चिम, तालूका वसई, जिल्हा पालघर ४०१ ३०३** येथील मालमत्तेच्या संबंधात होते व ५ संपूर्ण प्रदानित शेअर्सचे नोंदणीकरण धारक यांनी रु. पन्नास प्रत्येकी क्रमांक असलेल्या ४१ ते ४५ दोन्ही समाविष्ट असलेल्या सदर सोसायटीच्या कायद्या अंतर्गत आहेत. त्यामुळे आम्ही याद्वारे सदर फ्लॅटच्या संबंधात कोणतेही दावे वा आक्षेप असल्यास कोणाही व्यक्तीकडून दावे वा आक्षेप मागवीत आहोत व त्यांनी याद्वारे आमचे वकील यांचे कार्यालय येथे प्रसिद्धी तारखेपासून १४ दिवसांच्या आत सदर लेखी स्वरूपात सादर करणे आवश्यक आहे.

डी. एस. तिवारी
(वकील उच्च न्यायालय)

दि. ३०.०७.२०२३

शाखा : दुकान क्र. १९, आकांक्षा टॉवर, नालासोपारा (पू), तालूका वसई, जिल्हा ठाणे.


# पूर्व, पश्चिम द्रुतगती मार्गावर कोंडी; मुसळधार पाऊस, खड्डयांमुळे वाहन चालकांचे हाल

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : दक्षिण मुंबई आणि पूर्व उपनगरापेक्षा पश्चिम उपनगरात शुक्रवारी पावसाची संततधार सुरू होती. त्यामुळे पश्चिम द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कूर्मगतीने पुढे सरकत होती. तर, पूर्व आणि पश्चिम द्रुतगती महामार्गासह इतर रस्त्यांवरील खड्ड्यांचे प्रमाण वाढल्याने या मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या.

पश्चिम उपनगरात कांदिवली, जोगेश्वरी, दहिसर, मालाड, गोरेगाव, अंधेरी आणि वांद्रे येथील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. तसेच पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालकाला खड्ड्यांचा अंदाज येत नाही.



त्यामुळे खड्ड्यांमध्ये आदळून वाहनांचे नुकसान होत आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावर भांडूप ते गांधी नगर, ऐरोली टोल नाका येथे शुक्रवारी सायंकाळी प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. जोगेश्वरी - विक्रोली लिंक रोडवरून (जो व्ही एल आर) जोगेश्वरी, पवई परिसरात जाण्यासाठी प्रवाशांना दोन तासांचा वेळ लागत होता. वाकोलावरून कलिनाच्या दिशेने एकाच ठिकाणी १५ मिनिटे वाहने थांबली होती. मोहरममुळे वाहतूक मार्गात बदल

मुंबईतील विविध भागात शनिवारी मोहरमनिमित्त मिरवणूक काढण्यात येणार असल्याने वाहतूक व्यवस्थेत बदल केला आहे. मानखुर्द वाहतूक विभागाच्या हद्दीत कचरपट्टी जंक्शन जवळील करवाला मैदान येथे मिरवणूक काढण्यात येणार आहे. यासह कुर्ला, भायखळा, माहीम येथेही मिरवणुका काढण्यात येणार आहेत. त्यामुळे वाहनधारकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा, असे आवाहन वाहतूक पोलिसांनी केले आहे.

# विरार - बोळींजमधील शेवटचे घर विकले जाईपर्यंत अर्ज विक्री - स्वीकृती

## म्हाडाच्या कोकण मंडळाचा महत्त्वपूर्ण निर्णय

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : म्हाडाच्या कोकण मंडळाच्या विरार - बोळींज येथील गृहप्रकल्पातील शिल्लक घरे विकलीच जात नसल्याने मंडळाची डोकेदुखी वाढली आहे. 'प्रथम येणाऱ्यास प्राधान्य' या तत्वावरही सोडतीत या घरांची विक्री होऊ शकलेली नाही. त्यामुळे आता कोकण मंडळाने या घरांच्या विक्रीसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. कोकण मंडळाच्या सप्टेंबरमधील सोडतीत प्रथम प्राधान्य तत्वावर विरार - बोळींजमधील २२११ घरांचा समावेश करण्यात येणार असून यापैकी प्रतिसाद मिळणाऱ्या घरांची सोडत जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर प्रतिसाद न मिळालेल्या घरांसाठी तात्काळ नोंदणी, अर्ज विक्री - स्वीकृती प्रक्रिया सुरू होईल. मागणी करणाऱ्या पात्र अर्जदाराला या घराचे वितरण करण्यात येणार आहे. तर २२११ पैकी शेवटच्या घराची विक्री होईपर्यंत अर्ज विक्री - स्वीकृती, वितरण प्रक्रिया सुरूच राहणार आहे.कोकण मंडळाने बोळींज येथे सर्वात मोठा सुमारे दहा हजार घरांचा प्रकल्प हाती घेतला आहे. यातील अंदाजे नऊ हजार घरे बांधून पूर्ण झाली असून यापैकी सुमारे सहा हजार घरांची विक्री झाली आहे. मात्र या प्रकल्पात पिण्याच्या पाण्यासह विविध समस्या असून प्रत्यक्षात अंदाजे २१०० घरात रहिवाशी राहत आहेत. तर दुसरीकडे या प्रकल्पातील दोन हजारांहून अधिक घरे विकलीच गेलेली नाहीत. या घरांसाठी दोन ते तीन वेळा सोडत काढूनही ही घरे विकली गेलेली नाहीत. अखेर मंडळाने मे २०२३ च्या सोडतीत येथील २०४८ घरांचा समावेश 'प्रथम प्राधान्य' योजनेत केला. 'प्रथम प्राधान्य' योजनेत कोणालाही घर खरेदी करता येते. यात अनेक अटी शिथिल असतात. अगदी येईल त्याल घर या तत्वाने घराची विक्री होते. पण असे असतानाही मेमधील सोडतीतही २०४८ पैकी शे- दीडशे घरे विकली गेली. त्यामुळे कोकण मंडळाची डोकेदुखी आणखी वाढली आहे. त्यामुळे मोठे आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर कोकण मंडळाने या घरांच्या विक्रीसाठी एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. बोळींजमधील 'प्रथम प्राधान्य तत्वा'वरील घरांसाठी अर्ज विक्री - स्वीकृती आणि घराचे वितरण ही प्रक्रिया कायमस्वरूपी सुरू ठेवण्यात येणार आहे. सप्टेंबरच्या सोडतीत २१२२ घरांचा समावेश करण्यात येणार आहे. या घरांचा 'प्रथम प्राधान्य योजने'त समावेश असेल. सप्टेंबरमध्ये प्रतिसाद मिळणाऱ्या घरांसाठी सोडत काढून त्यांचे वितरण करण्यात येणार आहे. मात्र प्रतिसादाअभावी विक्री न होणाऱ्या घरांसाठी सोडतीनंतर तात्काळ अर्ज विक्री - स्वीकृती प्रक्रिया सुरू करण्यात येणार आहे. जो कोणी अर्ज करेल, अनामत रक्कम भरेल आणि पात्र ठरेल त्याला घराचे वितरण करण्याचा निर्णय घेण्यात आल्याचे मंडळातील वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले. मंडळाचे मुख्य अधिकारी मारोती मोरे यांनी या वृत्ताला दुजोरा दिला.


जाहीर सूचना

सूचना याद्वारे आम जनतेस आमचे अशील, **हिरेश शर्मा** हे **दुकान क्र. ८, एफ विंग, तळ मजला, सोसायटी न्यु मानसी कॉम्प्लेक्स को-ऑप. हा. सो. लि. म्हणून ज्ञात, साई कृपा कॉम्प्लेक्स, काशीगाव, मीरा रोड (पू), जिल्हा ठाणे ४०१ १०७** (यापुढे सदर दुकान म्हणून संदर्भित) येथील मालमत्तेचे सध्याचे मालक आहेत.

सदर दुकान **रविंद्र पाल शर्मा** यांच्याद्वारे **श्री. ब्रिजमोहन देवकीनंदन शर्मा** यांच्याकडून खरेदी केला होता, ज्याअर्थी दिवंगत **रविंद्र पाल शर्मा** यांचा मृत्यू **दि. १७.०७.२०२१** रोजी झाला होता व त्यांची पत्नी **उर्मिला शर्मा** यांचा मृत्यू **दि. ०३.०८.२०१०** रोजी झाला होता, त्यांच्या मागे **१. प्रतिभा पापने (मुलगी) व २. हिरेश शर्मा (मुलगा)** हे केवळ कायदेशीर वारस आहेत.

ज्याअर्थी वारस **प्रतिभा पापने** यांनी सदर दुकानाच्या संबंधातील त्यांचे हक्क, अधिकार व हितसंबंध आमचे अशील **हिरेश शर्मा** यांच्या नावे रिलीज करार **दि. २०.०८.२०२१** रोजी नोंदणीकरण क्र. **टीएनएन-१०-१०५०६-२०२१ दि.२०.०८.२०२१** अंतर्गत रिलीज्ड व रिलींक्वीश्ड केले आहेत.

आमचे अशील, सदर प्रसिद्धी मार्फत याद्वारे आम जनतेस सूचित करत आहेत की, जर कोणाही व्यक्तीस सदर फ्लॅट व/वा शेअर्स वा कोणत्याही भाग वा भागासंबंधात कोणतेही दावे वा हक्क, अधिकार, हितसंबंध असल्यास तसेच वारसा, शेअर, विक्री, खरेदी, गहाण, भाडेकरार, धारणाधिकार, परवाना, भेट, जप्ती वा अडथळे काही असल्यास वा अन्य काही असल्यास त्यांनी संबंधित दावे आमचे अशील यांना खालील निर्देशित पत्त्यावर सदर सूचनेच्या प्रसिद्धी तारखेपासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत दाखल करावे अन्यथा दावे काही असल्यास सदर व्यक्तींचे दावे अधित्यागीत व/वा परित्यागीत मानले जातील व आमचे अशील याकरिता बंधनकारक नसतील.

**(राजेंद्र सिंह राजपुरोहित)**
**वकील उच्च न्यायालय, मुंबई**
**दुकान क्र. ९, अस्मीता ओरिएन्ट सीएचएस लि., अस्मीता क्लबजवळ, मीरा रोड (पू), ठाणे : ४०१ १०७.**


# म्हाडा मुंबई मंडळ सोडत २०२३ : तब्बल एक लाख २० हजार १४४ अर्जदार सोडतीत सहभागी होणार

**मुंबई, दि. २९ (प्रतिनिधी)** : म्हाडाच्या मुंबई मंडळाच्या ४०८२ घरांच्या सोडतीसाठी अर्जदारांची अंतिम यादी अखेर शुक्रवारी म्हाडाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली. या यादीनुसार सोडतीत एक लाख २० हजार १४४ अर्जदार सहभागी होत असल्याचे स्पष्ट झाले. ही यादी प्रसिद्ध झाल्याने आता सोडतपूर्व प्रक्रिया संपुष्टात आली आहे. मात्र सोडत नेमकी कधी काढणार हे अद्याप गुलदस्त्यातच आहे.मुंबई मंडळाने या सोडतीत अत्यल्प, अल्प, मध्यम आणि उच्च अशा सर्वच गटांतील घरांचा पर्याय मुंबईकरांसाठी उपलब्ध केला आहे. महत्त्वाचे म्हणजे पहिल्यांदा मुंबईत पीएमएवायची घरे उपलब्ध करून अत्यल्प गटाला हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण करण्याची संधी दिली आहे. त्यामुळेच या सोडतीला चांगला प्रतिसाद मिळाला आहे. अर्ज स्वीकृतीच्या शेवटच्या दिवसापर्यंत अनामत रक्कमेसह एक लाख २२ हजारांहून अधिक अर्जदारांनी अर्ज दाखल केले होते. मात्र या अर्जांच्या छाननीत अंदाजे ५२३ अर्ज अपात्र ठरले होते. तर १४ हजारांहून अधिक अर्ज संशयास्पद आढळले होते.

अपात्र आणि संशयास्पद अर्जदारांकडून सूचना - हरकती मागवून त्यांची नव्याने छाननी करण्यात आली. त्यानंतर मंडळाने शुक्रवारी अर्जांची अंतिम यादी प्रसिद्ध केली आहे.


SCAN STEELS LIMITED

SCAN GROUP

CIN: L27209MH1994PLC076015

Reg. Off: Office No. 104, 105, E-Square, Subhash Road, Vile Parle(East), Mumbai-400057

Telephone: +91-022-26185461; Email: scansteels@scansteels.com

STATEMENT OF UNAUDITED FINANCIAL RESULTS FOR THE QUARTER ENDED 30TH JUNE, 2023

( Amount INR (In Lacs), except earning per share data )

| Sl No. | Particulars | Quarter Ended | | | Financial Year Ended |
|---|---|---|---|---|---|
| | | 30.06.2023 | 31.03.2023 | 30.06.2022 | 31.03.2023 |
| | | Unaudited | (Refer note 2 Audited | Unaudited | Audited |
| 1 | Total income from operations | 22,780.06 | 27,696.47 | 30,721.40 | 109,677.52 |
| 2 | Net Profit/ (Loss) for the period (before tax, Exceptional and/or Extraordinary items) | 597.71 | 376.28 | 2,763.73 | 2,199.90 |
| 3 | Net Profit/ (Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 597.71 | 376.28 | 2,763.73 | 2,199.90 |
| 4 | Net Profit/ (Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 470.85 | 234.95 | 2,054.89 | 1,531.90 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/ (Loss) for the period (after tax) and other comprehensive Income (after tax)] | 522.64 | 217.90 | 2,018.27 | 1,512.76 |
| 6 | Paid up Equity Share Capital (Face value of Rs. 10/- each) | 5,235.23 | 5,235.23 | 5,235.23 | 5,235.23 |
| 7 | Reserve (excluding Revaluation Reserves as shown in the Balance Sheet of previous year) | | | | 31,362.57 |
| 8 | Earnings Per Share (EPS) (of Rs. 10/- each) (not annulized) (Before and after Extraordinary Items) | | | | |
| | Basic | 0.90 | 0.45 | 3.93 | 2.93 |
| | Diluted | 0.90 | 0.45 | 3.93 | 2.93 |

Notes :

1 The above unaudited financial results have been reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors at their respective meetings held on July 29, 2023. The statutory auditors have carried out a Limited Review of the results for the quarter ended June 30 , 2023.

2 Figures for the quarter ended March 31,2023 represent the difference between the audited figures in respect of full financial year and published figures of nine months ended December 31, 2022.

3 The company has leased out, undertaking having sponge iron manufacturing facility situated in Bellary in the state of Karnataka, from the 1st day of December, 2022 On monthly rental . Hence, the Income from Operation for the both quarters January to March 2023 and quarter ended June 30, 2023 does not include turnover figure of Bellary unit.

4 The Company has paid Rs. 846.21 Lakhs during the quarter ended March 2023 (agreegating payment of Rs. 1041.51 Lakhs during the year )towards full payment of Right of Recompense (ROR) to State Bank of India. The above said component is included in the head "Finance Cost" as expenses to the Statement of profit & loss Account.

5 The Company is engaged in only one segment viz. Steel Manufacturing and as such there is no separate reportable segment as per IND AS -108 "Operating Segment".

6 Figures for the previous periods have been regrouped, rearranged and/or reclassified to confirm to the classification of the current period, wherever necessary. Also the figures of additions and/or substractions have been rounded up/off autometically for reporting at INR in lakhs.

7 The above results are available on the Company's website at www.scansteels.com and BSE website at www.bseindia.com.

For and on behalf of the Board of Directors
of Scan Steels Limited
Sd/-
Ankur Madaan
Whole Time Director
DIN : 07002199

29th July 2023
Bhubaneswar

